Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १७] गुरुवार ते बुधवार, मे ७-१३, २०२६/वैशाख १७-२३, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १०१.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक डी. टी. पी.-वि. यो. शेंदुरजनाघाट (सु.)-कलम-१२७ (२)-आदेश-टिपीव्ही-६-१७९३.—

ज्याअर्थी, शेंदुरजनाघाट नगर परिषदेची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतूदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२८११-१६६९-प्र. क्र. २५ अ-नवि-३०, दिनांक २० जुलै, २०११ (यापुढे " उक्त अधिसूचना " असे संबोधिली आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक १५ ऑक्टोबर, २०११ पासून अंमलात आलेली आहे; (यापुढे " उक्त मंजूर सुधारित विकास योजना " असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, मौजा शेंदुरजनाघाट येथील स. नं. १५८ (पै.) या जमिनीचे अंदाजे ०.४० हे. क्षेत्र आ. क्र. १ " प्राथमिक शाळा " या आरक्षणाने (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिले आहे) बाधित होत असल्याचे उक्त मंजूर सुधारित विकास योजना अहवालावरुन दिसून येते आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण हे नगरपरिषद, शेंदुरजनाघाट आहे (यापुढे " उक्त समूचित प्राधिकरण " असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा शेंदुरजनाघाट येथील स. नं. १५८/७ या जमिनीचे उक्त आरक्षणाने बाधित ०. ३७ हे. क्षेत्राबाबत (यापुढे " उक्त जमीन " असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक (यापुढे " उक्त जमीन मालक " असे संबोधिले आहे) यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी सूचना (यापुढे " उक्त सूचना " असे संबोधिले आहे) बजावली आहे, व ती समूचित प्राधिकरणास त्याच दिवशी प्राप्त झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने, विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे संपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, शेंदुरजनाघाट यांनी पत्र क्र. २३४८/२०२५, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये, उक्त सूचना प्राप्त झाल्यानंतर उक्त समूचित प्राधिकरणाकडून पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही व त्यामुळे उक्त आरक्षण व्यपगत होत असल्याचे सूचित करुन, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसारचा प्रस्ताव संचालनालयास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. I-९२०४३९-२०२६, दिनांक २० जानेवारी, २०२६ अन्वये, उक्त आरक्षण उक्त अधिनियमातील कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार व्यपगत ठरत असल्याने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे योग्य होईल, असा अहवाल संचालनालयास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता,उक्त जमिनीचे मंजूर अभिन्यासानुसार अंदाजे ३७०० चौ. मी. (०. ३७ हे.) क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र. क्र. ५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजुर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहेत, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

परिशिष्ट

अ. क्र.	नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त आरक्षण व वि. यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.)	उक्त जमिनीचा तपशील	व्यपगत झालेल्या उक्त आरक्षणाखालील अंदाजे क्षेत्र (हे.)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	शेंदुरजनाघाट नगर परिषद, मौजा शेंदुरजनाघाट, ता. शेंदुरजनाघाट, जि. अमरावती.	आ. क्र. १ "प्राथमिक शाळा" (क्षेत्र ०.४० हे.)	स. क्र. १५८/७ पै.	०.३७ हे.

टीप: १. उक्त आरक्षणामधुन मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, शेंदुरजनाघाट, जि. अमरावती यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ७ एप्रिल, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १०२.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P.-D.P. Shendurjanaghat (R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-1793.—

Whereas, the Revised Development Plan of Shendurjanaghat Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31(*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2811-1669-CR-25A-UD-30, dated 20th July, 2011(hereinafter referred to as "the said Notification") & has came into force with effect from 15th October, 2011(hereinafter referred to as "the said Sanctioned Revised Development Plan");

And whereas, in the Said sanctioned Revised Development Plan,area admeasuring approximately 0 .40 Ha. of the land bearing S. No. 158 (pt) of Mouza Shendurjanaghat is affected by the Reservation No. 1,"Primary School " (hereinafter referred to as "the said Reservation") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council Shendurjanaghat (hereinafter referred to as " the said Appropriate Authority")

And whereas, the land affected by the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan has come into force;

And whereas; the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") in respect of the area admeasuring 0.37 Ha of the land bearing S. No. 158/7, of Mouza Shendurjanaghat (hereinafter referred to as "the said Land ") affected by the said had served a notice Dated 27th March, 2023 as per the provisions of section 127(*1*) of the said Act (hereinafter referred to as "the said Notice ") on the said Appropriate Authority and the same has received to Appropriate Authority on same day ;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (*1*) of the said Act have been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act ;

And whereas, the Chief Officer,Municipal Council, Shendurjanaghat *vide* letter No. 2348/2025, Dated 18th September, 2025 has submitted the proposal as per the section 127(*2*) of the said Act to Directorate intimating therein that, the said Reservation is lapsed as no any action taken by the said Appropriate Authority after receiving the said Notice ;

And whereas, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati *vide* letter No. I/920439/2026, dated 20th January, 2026, has submitted report that, it is necessary to issue an order under the provisions of section 127(*2*) of the said Act as the said Reservation has to be lapsed as per the provisions of section 127 (*1*) the said Act ;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Revised Development Plan, the Drector of Town Planning,Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order under provisions of section 127(*2*) of the said Act, regarding lapsing of the said Reservation on the area admeasuring approximately 3700 Sq. mt. (0.37Ha.) as per the sanctioned Layout of the said land ;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR-508-UD-13, Dated 1st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127(*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/ Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parished as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127(*2*) of the said Act,& for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouza,Taluka and District	Proposal in the said Sanctioned Revised Development Plan & its Approxi, Area as per D. P. Report	Description of the Land	Approximate Area under the said Reservation lapsed Ha.
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1	Shendrjanaghat Municipal Council, Mouza Shendurjanaghat, Tal. Shendurjanaghat* Dist Amravati.	Reservation No. 1, " Primary School " (Area 0.40 Ha.)	S. No. 158/7 (Pt.)	0.37 Ha.

Note : (1) The said land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Sanctioned Revised Development Plan.

(2) A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council,Shendurjanaghat, District Amravati during office hours on all working days for inspection to public upto one month.

(3) This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 7th April, 2026.

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १०३.

मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. चे कलम ३७ (१) नुसार किरकोळ फेरबदल

शुध्दीपत्र

क्रमांक - नपादे-तां-८५१-२०२६.—

नगर परिषद, देऊळगावराजाने महाराष्ट्र शासन राजपत्र अमरावती विभागीय पुरवणी भाग एक -अ मध्ये दिनांक मे २९-०४ जून, २०२५ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रात देऊळगावराजा न. प. क्षेत्रातील मौजा पिंपळनेर मधील गट क्र. ६८ मधील ३.५६ हे. आर पैकी २४ मी. रुंद विकास रस्त्याखालील जमीन वगळता आ. क्र. ६३ बगीच्याचे आरक्षणाखालील जमीन व कृषी व तत्सम वापर क्षेत्राखालील जमीन वगळून त्याखालील जमीन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार किरकोळ फेरबदल करणेबाबत अधिसूचना प्रसिध्द केली होती,

सदर अधिसूचनेमध्ये नजरचुकीने नगरपरिषदेने तिच्या प्रशासकीय सभा दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ च्या सभेतील ठराव क्र. ०२ अन्वये मंजूर विकास योजना (सुधारित) मध्ये किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे. असे छापण्यात आले होते. **त्याऐवजी** खालील ठरावान्वये फेरबदल करण्याचे ठरविण्यात आले आहे. **असे वाचण्यात** यावे.

नगरपरिषदेने तिच्या प्रशासकीय सभा दिनांक २२ जानेवारी, २०२५ च्या सभेतील ठराव क्र. ०१ अन्वये मंजूर विकास योजना (सुधारित) मध्ये खालीलप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे. **असे वाचण्यात यावे.**

अ. क्र.	विकास योजना प्रस्ताव	प्रस्तावित फेरबदल
(१)	(२)	(३)
१	देऊळगावराजा न. प. क्षेत्रातील मौजा पिंपळनेर मधील गट क्र. ६८ मधील ३.५६ हे. आर जमिनीतील आ. क्र. ६३ बगीच्याचे आरक्षणाखालील क्षेत्र व २४ मी. रुंद विकास रस्ता, तसेच उर्वरित जमीन कृषी व तत्सम वापर क्षेत्र.	देऊळगावराजा न. प. क्षेत्रातील मौजा पिंपळनेर मधील गट क्र. ६८ मधील ३.५६ हे. आर पैकी २४ मी. रुंद विकास रस्त्याखालील जमीन वगळता आ.क्र. ६३ अन्वये बगीच्यासाठी आरक्षित क्षेत्रातील जमीन व कृषी व तत्सम वापर क्षेत्राखालील जमीन ही बगीच्याचे आरक्षणातून व कृषी व तत्सम वापर क्षेत्रातून वगळून ती रहीवासी क्षेत्रात समाविष्ट करणे.

अरुण देवचंद मोकळ,
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देऊळगावराजा.

देऊळगावराजा :
दिनांक २२ एप्रिल, २०२६.

भाग १-अ (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १०४.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

Minor Modification Under Section 37 (*1*) Of Maharashtra Regional And Town Planning Act, 1966

CORRIGENDUM

No. MCD-Desk-2-851-2026.—

Municipal Council,Deulgaon Raja has Published Notification in Govt. of Maharashtra Gazett Part -1 A Amravati Division for Minor Modification under section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Dated May 29-04 Jun, 2025 For Out of 3.56 H. A. land from Gat No. 68 of Mouze Pimpalner of Deulgaon Raja, Municipal Council, Area the land reserved for Garden *vide* Reservation No. 63 & land under Agriculture & allied user Zone (excluding the land reserved for 24 m. wide D. P. Road) shall be deleted and shall be included in Residential Zone, as per Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.

As per old Gazett. Dated May 29-04 Jun, 2025 by mistake Municipal Council,Deulgaon has decided to make following minor modification to the Sanctioned Develpment Plan *vide* its Resolution No. 02, Dated 07th February, 2025, so with reference to previous gazzete do *read* the correct Resolution No. as mentioned below.—

Municipal Council,Deulgaon Raja has decided to make following minor modification to the Sanctioned Develpment Plan *Vide* its Resolution No. 01, Dated 22nd January 2025.

Sr. No.	Propose in Sanctioned Development Plan	Proposed Modification
(1)	(2)	(3)
01	Deulgaon Raja, M. C. area Mouze Pimpalner Gat. No. 68, Site No. 63, Garden 24 m. D. P. Road & Agriculture Zone.	Out of 3.56 H.A. land from gat.No. 68 of Mouze Pimpalner of Deulgaon Raja, M. C. Area the land reserved for Garden *vide* Reservation No. 63 & land under Agriculture & allied user Zone (excluding the land reserved for 24 m. wide D. P. Road) shall be deleted and shall be included in Residential Zone.

ARUN DEOCHAND MOKAL,
Chief Officer,
Municipal Council,Deulgaon Raja.

Deulgaon Raja :
Dated 22nd April, 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.